**कृपया प्रसिध्दीसाठी -** **23 मार्च 2009**

## ''युपीए च्या राज्यात भारत असहाय्य व असुरक्षित ''
## श्री. रवि शंकर प्रसाद, राष्ट्रीय प्रवक्ता, भाजपा

**मुंबई, सोमवार:** "काँग्रेसप्रणित युपीए च्या राज्यात भारत असाहय व असुरक्षित झाला आहे. 'कांग्रेस का हाथ गरीबों के साथ' ची घोषणा देणा-या काँग्रेसने प्रत्यक्षात मात्र प्रचंड महागाई आणून सामान्य माणसाचे जगणे मुशिकल केले आहे. पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह स्वतः अर्थतज्ञ असूनही देशाची अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडलेली आहे. कोणताही निर्णय पंतप्रधान स्वतः घेऊ शकत नाहीत, प्रत्येक गोष्टीसाठी सोनिया गांधीकडे धाव घेतात. सद्य परिस्थितीत देशाला गरज आहे एका सक्षम पंतप्रधानाची आणि निर्णायक सरकारची. केवळ लालकृष्ण आडवाणी यांचे नेतृत्वच असे सरकार देऊ शकते", असे प्रतिपादन भाजपा राष्ट्रीय प्रवक्ता श्री रविशंकर प्रसाद यांनी काल मुंबईत केले. माजी पेट्रोलियम मंत्री श्री राम नाईक यांच्या 5 व्या कार्यवृत्त प्रकाशन समारंभात श्री. रविशंकर बोलत होते.

यावेळी बोलताना श्री. रविशंकर म्हणाले, "आज तुम्हाला प्रत्येक ठिकाणी रांगा दिसतात. पेट्रोल, डिझेल चे भाव वाढलेले आहेत. पंधरा-पंधरा दिवस थांबूनही गॅस मिळत नाहीत. गॅस व रॉकेलचा काळाबाजार सुरु आहे. तुम्हीच आठवा राम नाईक पेट्रोलीयम मंत्री असताना काय स्थिती होती. गॅस सिलेंडर च नव्हे तर नविन गॅस जोडणी देखिल मागताक्षणी मिळत होती. मुंबईच्या रेल्वे व्यवस्थे साठी श्री नाईक यांनी केलेल्या कार्याबद्दल त्यांची देशभर कीर्ति आहे. आज ते जनप्रतिनिधी नसतानाही मतदारांना आपला अहवाल सादर करतात. आता तुम्ही पुन्हा एकदा योग्य निर्णय घेऊन त्यांना खासदार कराल याची मला खात्री आहे.

"राम नाईक म्हणजे सर्वस्पर्शी व्यक्तिमत्व आहे. सर्वधर्मीयांशी त्यांचे जवळचे संबंध दिसतात. कृष्ठपीडितां सारख्या समाजातील उपेक्षित वर्गाला ही ते आधारस्तंभ वाटतात. त्याचबरोबर संपूर्ण मतदार यादीचा अभ्यास करुन मतदार यादीतील डुप्लीकेट मतदार शोधायचे किचकट काम ते करतात. अशा कार्यक्षम व्यक्तिला उत्तर मुंबईतील मतदारांनी पुन्हा एकवार लोकसभेवर पाठविले पाहिजे", असे सांगत असतानाच शिवसेना नेते मनोहर जोशी म्हणाले, 'शिवसेना-भाजपा युतीचे पंतप्रधान श्री लालकृष्ण आडवाणीच असतील असा मी या प्रचंड जनसमुदायासमोर पुनरुच्चार करु इच्छितो. भाजपा ही देशातील नितिमत्तेने चालणारी राजकीय पार्टी आहे आणि म्हणूनच आमचे तिला समर्थन आहे.' श्री. मनोहर जोशी यांनीच सदर समारंभात श्री. नाईक यांच्या कार्यवृत्तचे प्रकाशन केले.

यावेळी आपल्या मतदारांशी थेट संवाद साधताना श्री.नाईक म्हणाले, "ज्या मतदारांनी सलग आठ वेळा निवडून दिले त्यांनी एकदा पराजय पदरात टाकला म्हणून मी तक्रार करणे योग्य नाही. मला त्यांचे काम करीत राहिलेच पाहिजे या भावनेने गेली पाच वर्ष मी सतत कार्यरत राहिलो. तुम्ही ही मी कोणत्याही पदावर नसतानाही पूर्वीच्याच प्रेमाने व हक्काने येत राहिलात त्यामुळेच आज पुन्हा एकदा विश्वासाने भारतीय जनता पार्टीने मला येथून उमेदवारी दिली आहे. गेली पाच वर्षे अनेक आंदोलने केली. चारकोप मेट्रो कारशेडमुळे हजारों कुटूंबे बेघर होऊ नये, खाजगी वनजमिनी संबंधाचा त्रास सामान्य नागरिकांना सोसू लागू नये, रेल्वे प्रवासात प्रवाश्यांना कमीत कमी त्रास व्हावा यालाच माझे येत्या काळात प्राधान्य राहील."

हजारो नागरिकांच्या उपस्थितीत कांदिवली पूर्व येथे तेरापंथ मैदानात भरलेल्या विशाल सभेपुढे बोलताना शिवसेना-भाजपा युतीचे उत्तर पश्चिम मुंबई चे उमेदवार श्री गजानन कीर्तिकर म्हणाले "जोगेश्वरी ते दहिसर परिसरातरातील सेना-भाजप कार्यकर्त्यांचे राम नाईक हे आधारस्तंभ व मार्गदर्शक आहेत. अश्या रामभाऊंचे बोट धरुनच मी लोकसभेत प्रवेश करु इच्छितो." भाजपा मुंबईचे अध्यक्ष श्री गोपाळ शेट्टी म्हणाले, "भारतीय जनता पार्टीचा इतिहास उत्तर मुंबई घडविते. युतीच्या प्रत्येक कार्यकर्त्यांने आता हया इतिहासाचे शिल्पकार बनून घरोघर गेले पाहिजे". शिवसेना विभाग प्रमुख श्री विनोद घोसाळकर यांनी यावेळी कार्यकर्ते कुठेही कमी पडणार नाहीत आणि येथे युतिचा विजय निश्चित आहे असा विश्वास व्यक्त केला.

भाजपा उत्तर मुंबई चे अध्यक्ष श्री योगेश सागर यांनी हया वेळी प्रास्ताविक केले. तर नगरसेवक श्री. शिवकुमार झा यांनी उपस्थितांचे स्वागत केले. श्री जगदीश पटेल यांनी उपस्थितांचे आभार मानले. ॲड श्री जयप्रकाश मिश्र यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सदर कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री शशिकांत खानविलकर यांनी केवळ फणी व बसचे टिकीट वापरुन सादर केलेल्या गीतांनी उपस्थितांचे मनोरंजन केले.

सदर कार्यक्रमाला उपमहापौर श्री. विनोद घेडिया, सर्वश्री भाई गिरकर, आर.यु.सिंह, जयप्रकाश ठाकूर, अतुल भातखळकर, श्रीमती पारुल मेहता, श्रीमता बिंदा कीर्तिकर, डॉ. राम बारोट, मोहन मिठबांवकर, ॲड ज्ञानमुर्ति शर्मा, कु. भारती केणी, दिलीप पटेल, रोहिदास पाटील, श्रीमती शैलजा गिरकर, अलका नरसाळे, रामब्रिज यादव, डॉ. श्याम अग्रवाल, रामजस उपाध्याय, विलास पोतनीस आदि युतिचे अनेक नेते उपस्थित होते.

**(कार्यालय सचिव)**